प्रकरण पहिले

प्रकरण पहिले

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे स्वरूप

(The Nature of Sant Gadagebaba Gram Swachhata Abhiyan)

१. प्रस्तावना

ग्रामीण परिसराची, गावांची, घरांची स्वच्छता व्हावी, सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान व पर्यायाने जीवनमान उंचवावे व त्यायोगे 'स्वच्छतेतून समृध्दीकडे' ही संकल्पना मूर्त स्वरूपात यावी या उद्देशाने 'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' महाराष्ट्रात सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत राबविण्यात येणा-या कार्यक्रमांची परिणामकारक अंमलबजावणी करून गावातील स्वच्छतेची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यात ग्रामस्थांचा उस्फूर्त सहभाग, एकजूट व सहकार्य अपेक्षित आहे. जनतेने आपली कल्पकता व परंपरागत ज्ञानाच्या आधारे स्थानिक कच्च्या मालाचा वापर करून, स्वच्छतातंत्र विकसित करण्याची गरज आहे. त्यामध्ये शासनाची भूमिका सहाय्यकर्ता, सहभागीदार व मार्गदर्शकाची असणार आहे.

ग्रामीण भागातील स्वच्छतेची दुरावस्था पाहून ग्रामीण परिसर स्वच्छ व सुंदर रहावा म्हणून ज्यांनी स्वत: परिश्रम घेतले त्या "संत गाडगेबाबा" यांच्या नावाने सन २०००-०१ पासून दरवर्षी ग्रामस्वच्छता अभियान, संपूर्ण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात राबविण्यात येत आहे. सन २००३-०४ पासून हे अभियान केवळ मोहीम स्वरूपात न राबविता लोक चळवळ या स्वरूपात वर्षभर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

२. महाराष्ट्रातील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे उद्देश

महाराष्ट्र शासनाच्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे उद्देश पुढीलप्रमाणे -

१. घरांची, गावांची स्वच्छता राखणे.

२. ग्रामीण परिसर स्वच्छ राखणे व पर्यावरण संतुलित ठेवणे.

३. ग्रामीण भागात अस्वच्छतेमुळे व अस्वच्छ पाण्यामुळे होणारे रोग यावर नियंत्रण ठेवणे.

४. व्यक्तिगत आरोग्याची काळजी घेण्यास लोकांना प्रवृत्त करणे.

५. ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावणे.

६. ग्रामीण भागात कायमस्वरूपी स्वच्छतेची संस्कृती निर्माण करणे.

प्रामुख्याने उघड्यावरील शौचविधीमुळे ग्रामीण परिसर सर्वात जास्त प्रमाणात प्रदूषित होतो. त्याचे आरोग्यावर अनिष्ट व आयुष्यभर भोगावे लागणारे परिणाम होतात. म्हणून शौचालयांचा योग्य व अनिवार्य वापर या घटकास या अभियानात २००३-०४ सालापासून अधिक महत्त्व देण्यात येत आहे. गावातील केवळ एक व्यक्ती जरी उघड्यावर शौचास जात असेल तर ती संपूर्ण गावाचे आरोग्य दूषित करते. ग्रामीण भागात वारंवार उद्‌भवणारे रोग उदा. कावीळ, विषमज्वर, पटकी इ. साथीसुध्दा मानवी विष्ठेमुळे दूषित झालेले पाणी प्यायल्याने उद्‌भवतात हे स्पष्ट असे कटू सत्य आहे. हे टाळण्यासाठी स्वच्छतेशी निगडीत एकूण सर्व घटकबरोबरच शौचालयाचा योग्य व नियमित वापर अनिवार्य आहे. तसेच आरोग्याच्यादृष्टीने पिण्याचे पाणी व अन्नपदार्थाची योग्य हाताळणी इ. घटकानाही अभियानात महत्त्व देण्यात आले आहे.

३. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची पूर्वतयारी

अ) दरवर्षी दिनांक २० ते २५ सप्टेंबर अभियानाची पूर्वतयारी

या अभियानाची लाक्षणिक स्वरूपात सुरूवात जरी दरवर्षी २ ऑक्टोबर पासून होत असली तरी तत्पूर्वी दिनांक २० ते २५ सप्टेंबर या कालावधीत या अभियानाची पूर्वतयारी करण्यात येते. या कालावधीत जिल्हास्तरावर पालकमंत्री, जिल्हा ग्रामस्वच्छता अभियान समितीची सभा होते. दिनांक २ ऑक्टोबर पासून सुरू होणा-या अभियानात सर्व गावांनी सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करतात. जिल्हा स्तरावरील अभियान समितीचे गठन केले जाते.

ब) दरवर्षी २६ ते २९ सप्टेंबर

या दिवशी गटविकास अधिकारी, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक यांची सभा तालुका स्तरावर बोलावतात. सदर सभेस संबंधित मा. आमदार, पंचायत समितीतील सर्व जिल्हा परिषद सदस्य, सभापती, उपसभापती, पंचायत समिती सदस्य, सेवाभावी संस्था, कॉलेजचे प्राध्यापक इत्यादी मान्यवरांना निमंत्रित करण्यात येते व सर्वांना अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले जाते.

क) दरवर्षी दिनांक ३० सप्टेंबर

या दिवशी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, ग्रामपंचायत समितीची मासिक सभा घेतात. ग्रामस्तरावरील अभियान समिती गठीत करतात. जर या दिवशी ग्रामपंचायतीची मासिक सभा घेणे शक्य झाले नाही तर दि. १ ऑक्टोबर रोजी ही सभा घेण्यात येते.

ड) दरवर्षी दिनांक १ ऑक्टोबर

दि. १ ऑक्टोबर रोजी महिला ग्रामसभा बोलाविण्यात येते व अभियानाच्या तयारीची चर्चा करून कृती कार्यक्रम तयार करतात.

४. अभियानाची औपचारिक सुरूवात

दरवर्षी दिनांक २ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व ग्रामपंचायतीतून एकाचवेळी ग्रामसभा घेण्यात येते. या ग्रामसभेला जिल्हा व तालुका स्तरावरील विशेष अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करतात. त्यांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हयातील सर्व शासकीय खात्याच्या कर्मचा-यांतून करतात. यासाठी जिल्हाधिकारी सहकार्य करतात. या दिवशी सर्व ग्रामपंचायतीत ग्रामसभा व्हाव्यात व त्यास जिल्हा स्तरावरील शासकीय कर्मचारी उपस्थित रहावेत यासाठी प्रत्येक जिल्हयाचे जिल्हाधिकारी, सर्व शासकीय खात्यातून आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देतात. या दिवशी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची औपचारिक सुरूवात होते.

५. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान वातावरणनिर्मितीसाठी ग्रामस्तरावरील घ्यावयाचे विविध कार्यक्रम

१. गाव परिसर हागणदारीमुक्त करण्यासाठी उपायोजना, आवश्यक ती शौचालये बांधण्यास प्राधान्य देणे.

२. रस्त्यावर कोणतीही घाण शिल्लक राहणार नाही अशा पध्दतीने रस्ते साफ करणे.

३. उद्‌भव पुनर्भरण, शिवकालीन पाणी साठवण टाक्या बांधणे.

४. पाणीपट्टी व स्वच्छता कर पूर्णपणे वसूल करणे.

५. स्थानिक कर्मचा-यांची पाणी पुरवठ्यासाठी नियुक्ती करणे. (महिलांना प्राधान्य देणे)

६. पाणी पुरवठा योजना ताब्यात घेणे. तसेच पाणी पुरवठा प्रयोगशाळा व तिचा वापर करणे.

७. पाणी योजनेला व शौचालयांना किमान डागडुजीची गरज व त्यावर खर्च करून ती दुरुस्त करणे.

८. स्वच्छता प्रशिक्षणासाठी कार्यशाळा, शासनाने तयार केलेल्या जाहिराती, लघुपट, फिल्मस् (विशेषतः या अभियानाच्या जाहिराती, आरोग्य लक्ष्मी, सोनपावलं, शापित जलबिंदू हे लघुपट वाड्यावाड्यात व वस्त्यावस्त्यात दाखविणे.)

९. स्वच्छता विषयक वस्तूंचे/उपाययोजनांचे प्रदर्शन घेणे. विशेषतः कमी खर्चाची शौचालयाचे नमुने, गावात एक दोन ठिकाणी बांधून त्याचा प्रसार करणे.

१०. गावातील भिंतीवर वेगवेगळे स्लोगन लावणे/रंगविणे/स्लोगन स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, कलापथक कार्यक्रम/कीर्तन, स्वच्छता प्रभातफेरी, मशाल यात्रा व स्वच्छता दिंड्या.

११. इतर गावाना, विशेषत: या अभियानात जिल्हा/विभाग/राज्यस्तरावरील पुरस्कार प्राप्त गावांना भेटी देणे.

१२. किमान खर्चाचे शौचालय बांधणीतील पुढाकार व भंगीमुक्ती कार्य करणे.

१३. टीसीएल पावडरचा/हायपोक्लोराइडचा सुयोग्य वापर करणे.

१४. आरोग्य घटकाखालील कार्य व जनजागृती (घनकचरा विल्हेवाट, सांडपाणी निचरा, शोषखड्डे, पाणी व अन्नाची हाताळणी, शौचालयाचा वापर, किमान तीन वेळा हात धुणे इ.)

१५. नाविन्यपूर्ण उपक्रम जसे स्थानिक मालमत्तेचा, कच्च्या मालाचा उपयोग इत्यादी (संडास, बांधकाम, कंपोस्ट खत निर्मिती इत्यादी)

१६. अधिकारी/पदाधिकारी यांच्या वाहनांवर स्वच्छताविषयक संदेश.

१७. गटनिहाय स्पर्धा (आंतर वाडी/घर/शाळा वाड्या/क्लब/स्पोटर्स क्लब/ महिला मंडळे/युवक मंडळे अशा विविध गटात अभियानाशी संबंधित विविध बाबीशी निगडीत स्पर्धा घेणे).

१८. आंतरघरे/कुटुंबे स्पर्धा (स्वच्छ घर/गोठा/आवार/शौचालय/न्हाणीघर/ आदर्श माजघर/उत्कृष्ट करणे).

१९. वैयक्तिक स्पर्धेचे आयोजन (निबंध स्पर्धा, म्हणी स्पर्धा, स्लोगन स्पर्धा, संदेश स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, सदृढ बालक स्पर्धा, आदर्श माता स्पर्धा, शरीर सौष्ठव स्पर्धा घेणे).

६. ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत ऑक्टोबर महिन्यात राबविण्यात येणारे कार्यक्रम

ग्रामपंचायत स्तरावर पुढीलप्रमाणे कार्यक्रम सुरू केले जावेत अशी शासनाची सूचना आहे.

१. दरवर्षी दिनांक ३ व ४ ऑक्टोबर : ग्रामसफाई व कचरा मुक्ती जागृती मोहीम

२. दरवर्षी दिनांक ५ व ६ ऑक्टोबर : शोषखड्डयांची स्वच्छता/बांधकाम जागृती मोहीम

३. दरवर्षी दिनांक ७ व ८ ऑक्टोबर : शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहीम

४. दरवर्षी दिनांक ९ व १० ऑक्टोबर : घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहीम

५. दरवर्षी दिनांक ११ व १२ ऑक्टोबर : स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिक, प्रचार प्रसिध्दी याबाबतच्या तांत्रिक ज्ञानाबाबतची प्रात्यक्षिके

६. दरवर्षी दिनांक १३ व १४ ऑक्टोबर : शौचालय दुरूस्ती/बांधकाम अभियान मोहीम

७. दरवर्षी दिनांक १५ व १६ ऑक्टोबर : पाणी शुध्दता, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहीम

८. दरवर्षी दिनांक १७ व १८ ऑक्टोबर : वैयक्तिक स्वच्छता जागृती (नखे काढणे, स्वच्छ आंघोळ, केस धुणे, उवा निर्मूलन) मोहीम

९. दरवर्षी दिनांक १९ व २० ऑक्टोबर : रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहीम

१०. दरवर्षी दिनांक २१ व २२ ऑक्टोबर : जनावरे स्वच्छता मोहीम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा

११. दरवर्षी दिनांक २३ व २४ ऑक्टोबर : वृक्ष संवर्धन, परसबाग, अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहीम

१२. दरवर्षी दिनांक २५ व २६ ऑक्टोबर : गावात स्लोगन (घोषवाक्य) स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहीम

१३. दरवर्षी दिनांक २७ व २८ ऑक्टोबर : सदृढ बालक स्पर्धा, माता बाल संगोपन, रोगनिदान व साथीचे रोग प्रतिबंध मोहीम

१४. दरवर्षी दिनांक २९ व ३० ऑक्टोबर : गटारे, सांडपाणी निर्मूलन, सांडपाणी वापर मोहीम

१५. दिनांक ३१ ऑक्टोबर : संकल्प दिवस

वरील दिवसात स्वच्छतेशी निगडीत नमूद केलेल्या बाबी, ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात सातत्याने पुढे वर्षभर राबवावयाच्या आहेत त्यांची ग्रामस्थांना माहिती व्हावी, त्यातून त्या घटकाबाबत त्यांच्यात जाणीव जागृती व्हावी यादृष्टीने या कालावधीत कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे. तसेच या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर किंवा त्याखाली गाव, वॉर्ड, वस्ती, शाळा, मंडळे स्तरावर त्या दिवसाचे महत्त्व विचारात घेवून वैयक्तिक स्पर्धा आयोजित कराव्यात. जसे आदर्श माता, स्वच्छ घर, स्वच्छ शाळा वर्ग, स्वच्छ गोठा, स्वच्छ गल्ली, स्वच्छ वस्ती, उत्कृष्ट पाणी साठवण, उत्कृष्ट जनावर, उत्कृष्ट स्वयंपाक, सदृढ मूल इत्यादी. गावाने याबाबत स्वस्तरावर निर्णय घ्यावा. यात विविध कला, खेळ, वादविवाद, गाणी, म्हणी याही स्पर्धांचे आयोजन केले जाते.

वरीलप्रमाणे केलेल्या सर्व कामांचे रेकॉर्ड ठेवणेही अत्यंत आवश्यक आहे. ज्या ग्रामपंचायती वरीलप्रमाणे दिवस साजरा करणार नाहीत त्यांचे स्पर्धेसाठी मूल्यमापन करण्यात येत नाही.

७. पारितोषिकांची योजना

अभियान दृढमूल होण्यासाठी खालीलप्रमाणे पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अ) या अभियानांतर्गत ज्या ग्रामपंचायती हिरीरीने सहभागी होतील त्यांच्यातून खाली नमूद केलेल्या स्तरावर स्वच्छतेचा महामंत्र महाराष्ट्राच्या कानाकोप-यात "ग्रामगीते" द्वारे पोहोचविणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने रोख स्वरूपात बक्षिसे देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१. पंचायत समिती स्तरावर उत्कृष्ठ ठरणा-या प्रत्येक पंचायत समिती क्षेत्रातील तीन ग्रामपंचायती

२. जिल्हा स्तरावर उत्कृष्ठ ठरणा-या प्रत्येक जिल्हयातील तीन ग्रामपंचायती

३. विभागीय स्तरावर उत्कृष्ठ ठरणा-या प्रत्येक विभागातील दोन ग्रामपंचायती

४. राज्य स्तरावर, संपूर्ण राज्यात उत्कृष्ठ ठरणा-या पहिल्या तीन ग्रामपंचायती

ब) जिल्हा परिषद क्षेत्रातील व पंचायत समिती क्षेत्रातील एकूण ग्रामपंचायतीच्या संख्येचा विचार करून ज्यांच्या क्षेत्रात सर्वात जास्त टक्केवारीने ग्रामपंचायतीना ५० टक्के पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत अशा प्रत्येक महसूली विभागातील गुणानुक्रमे एक जिल्हा परिषद व एक पंचायत समिती आणि राज्यातील गुणानुक्रमे पहिल्या तीन जिल्हा परिषदा व राज्यातील पहिल्या तीन पंचायत समित्यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने रोख स्वरूपात बक्षिसे, स्मृतीचिन्हे व प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

क) जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर जी गावे कुटुंब कल्याण, पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन, सामाजिक एकता या विषयात उत्कृष्ठ कामगिरी बजावतील त्यांना अनुक्रमे स्व. आबासाहेब खेडकर, स्व. वसंतराव नाईक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर रोख स्वरूपात विशेष बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

ड) याव्यतिरिक्त जिल्हा परिषद मतदार संघस्तरीय तपासणीत निवडलेल्या गुणानुक्रमे प्रथम तीन ग्रामपंचायतींना, संबंधित जिल्हा परिषदा आपल्या स्वनिधीतून अथवा प्रायोजकांमार्फत रोख अथवा साहित्यरूपाने बक्षिसे देऊ शकतात. ह्या बक्षिसांची रक्कम जास्तीत जास्त अनुक्रमे रू. ५,०००/-, रू. ३,०००/- व रू. २,०००/- एवढी असेल.

८. उत्कृष्ट ग्रामपंचायतीची व विशेष बक्षिसासाठी ग्रामपंचायतीची निवड करण्यासाठीच्या समित्यांचे गठन

शासकीय परिपत्रकात बक्षिसासाठी ग्रामपंचायतीची निवड करण्यासाठी विविध स्तरावरील समित्यांचे गठन कसे करावे यासंबंधीच्या तपशीलवार सूचना दिल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

१. प्रथम फेरी : जिल्हा परिषद मतदार संघस्तरीय तपासणी

सर्वात प्रथम जिल्हा परिषद मतदार संघस्तरीय समितीच्या त्यांना नेमून दिलेल्या जिल्हा परिषद मतदार संघातील ग्रामपंचायतीना तपासणी भेटी पार पडतात.

अ) समितीचे सदस्य - ह्या समितीमध्ये खाली नमूद केलेले सदस्य समाविष्ट असतील.

ज्या जिल्हा परिषद मतदार संघातील ग्रामपंचायतीची तपासणी करावयाची आहे तो मतदार संघ ज्या पंचायत समिती कार्यक्षेत्रात अंतर्भूत असेल ती पंचायत समिती सोडून जिल्हयातील कोणत्याही -

१. दुस-या पंचायत समिती कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद कौन्सीलर - अध्यक्ष

२. दुस-या पंचायत समितीतील दोन पंचायत समिती सदस्य - सदस्य

३. दुस-या पंचायत समितीतील कोणतीही एक मुख्य सेविका (एकात्मिक बालविकास सेवा) - सदस्य

४. दुस-या पंचायत समितीतील कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्राचे एक डॉक्टर - सदस्य

५. दुस-या पंचायत समितीतील कोणत्याही एका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका - सदस्य

६. सेवाभावी संस्थेचा एक प्रतिनिधी (मुख्य कार्यकारी अधिका-यांनी नियुक्त केलेला) - सदस्य

७. विकास गटाबाहेरील कोणताही एक शाखा अभियंता (Water Supply /Works) - सदस्य

८. जिल्हा पत्रकार संघ, लायन्स क्लब, एन. एस. एस., एन. सी. सी. इत्यादी यंत्रणातील शिफारस केलेल्या प्रतिनिधीपैकी सभापती, पंचायत समिती यांनी नियुक्त केलेला एक प्रतिनिधी - सदस्य

९. "ग्रामस्थांच्या सनद" अंतर्गत स्थापन केलेल्या प्रभाग समितीचे सचिव, उपरोक्त समितीचे सदस्य सचिव म्हणून काम बघतील.

वरील सर्व समिती सदस्य दुस-या पंचायत समितीतील एकाच जिल्हा परिषद मतदार संघातील असण्यास हरकत नाही.

ब) कार्यपध्दती

या प्रथम तपासणी फेरीत सदर समितीने नेमून दिलेल्या जिल्हा परिषद मतदार संघातील अभियानात सहभागी झालेल्या सर्व ग्रामपंचायतीना भेटी देवून ग्रामपंचायत क्षेत्रात एकूण किमान ५० टक्के कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे याची पडताळणी करून नंतर सदर समितीने अभियानांतर्गत नेमून दिलेल्या सर्व निकषानुसार केलेल्या कामाची तपासणी काटेकोरपणे करावी. त्यानंतर अशा पात्र ग्रामपंचायतीतून किमान ५० टक्के गुण मिळालेल्या गुणानुक्रमे ३ उत्कृष्ट ग्रामपंचायतींची निवड करून व ती ज्या प्रभागातील गावाची तपासणी केली त्या ग्रामपंचायतीच्या प्रभाग समितीची व तपासलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंचाची/प्रतिनिधीची सभा घेऊन त्यात जाहीर करावयाची आहे. या सभेत गावांना क्रमांक देण्याची, गुण देण्याची कारणमीमांसा देण्यात यावी. अर्थात समितीचा निर्णय अंतिम राहील व समितीच्या कारणमीमांसेला कोठेही आव्हान देता येणार नाहीत. प्रत्येक सदस्याने प्रथम प्रत्येक मुद्दयावर स्वतंत्र गुण देवून त्यांचे एकत्रिकरण नंतर सदस्य सचिवाने करून त्याची सरासरी काढून नंतर त्याबाबतचा अहवाल निवड समितीतील सर्व सदस्यांच्या सह्या घेवून संबंधित गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बंद पाकीटात पाठवावयाचा आहे. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणांची गुणपत्रिका निवड

समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित गटविकास अधिका-यामार्फत संबंधित ग्रामपंचायतीस विहित नमुन्यात पाठवावयाची आहे.

२. **दुसरी फेरी - पंचायत समिती स्तरीय तपासणी**

अ) **समितीचे सदस्य** - ह्या समितीमध्ये खाली नमूद केलेले सदस्य समाविष्ट असतील.

१. पंचायत समितीचे सभापती - अध्यक्ष

२. पंचायत समितीतील उपसभापती अथवा एक सदस्य - सदस्य

३. पंचायत समितीतील बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना - सदस्य

४. पंचायत समितीतील गट शिक्षणाधिकारी - सदस्य

५. पंचायत समितीतील एक उप अभियंता (बांधकाम/पाणी पुरवठा/लघुसिंचन) - सदस्य

६. पंचायत समितीतील कोणत्याही एका आरोग्य केंद्राचे डॉक्टर - सदस्य

७. जिल्हा पत्रकार संघाने नियुक्त केलेला, अभियानाशी प्रत्यक्ष हितसंबंध नसलेला प्रतिनिधी - सदस्य

८. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियुक्त केलेली एक सेवाभावी संस्था/ सोशल क्लब, एन. एस. एस./एन. सी. सी. यांचे प्रतिनिधी - सदस्य

९. गटविकास अधिकारी - सदस्य सचिव

(वरील सर्व अधिकारी एकाच पंचायत समितीतील असण्यास हरकत नाही.)

ब) **कार्यपध्दती**

या समितीने दुस-या जिल्हयातील ज्या पंचायत समिती क्षेत्रासाठी त्याची नियुक्ती केलेली असेल त्या पंचायत समितीतील प्रत्येक जिल्हा परिषद मतदार संघातून निवडलेल्या गुणानुक्रमे प्रथम ३ ग्रामपंचायतींची यादी करावी व त्यापैकी किमान ६०

टक्के गुण मिळालेल्या सर्व ग्रामपंचायती तपासून पंचायत समिती स्तरावरील गुणानुक्रमे ३ ग्रामपंचायती विहित निकष विचारात घेवून निवडण्यात येतील.

ही निवड करताना प्रत्येक सदस्याने प्रथम प्रत्येक मुद्दयावर स्वतंत्र गुण देवून त्यांचे एकत्रिकरण नंतर सदस्य सचिवाने करून त्याची सरासरी काढून नंतर त्याबाबतचा अहवाल निवड समितीतील सर्व सदस्यांच्या सह्या घेवून संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बंद पाकीटात पाठवावयाचा आहे. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणाची गुणपत्रिका निवड समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित ग्रामपंचायतीस पाठवावयाची आहे.

३. **तिसरी फेरी : जिल्हास्तरीय तपासणी**

अ) **समितीचे सदस्य** : या समितीमध्ये खाली नमूद केलेले सदस्य समाविष्ट असतील.

१. अध्यक्ष, जिल्हा परिषद - अध्यक्ष

२. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती - सदस्य

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य

४. जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक) - सदस्य

५. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद - सदस्य

६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद - सदस्य

७. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियुक्त केलेला एका सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधी - सदस्य

८. जिल्हा पत्रकार संघाने नियुक्त केलेला प्रतिनिधी - सदस्य

९. जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य

१०. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक - सदस्य

११. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) - सदस्य सचिव

ब) कार्यपध्दती

जिल्हयातील प्रत्येक पंचायत समितीतून निवड करण्यात आलेल्या प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतीपैकी ज्या ग्रामपंचायतीना किमान ६० टक्के गुण मिळालेले आहेत त्यांची तपासणी करून जिल्हा स्तरावरील गुणानुक्रमे ३ ग्रामपंचायतींची निवड करण्यात येईल. तसेच सदर निकाल संबंधित जिल्हा परिषदेत पदाधिकारी, अधिकारी, पत्रकार यांच्या सभेत तपासलेल्या संबंधित ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत जाहीर करण्यात यावा. तसेच यावेळी प्रत्येक सदर ग्रामपंचायतींनी केलेले उत्कृष्ट कार्य, तसेच अधिक सुधारणा अपेक्षित असलेल्या बाबी सांगण्यात याव्यात. या सर्व ग्रामपंचायतींना मिळालेल्या बाबनिहाय एकत्रित सरासरी गुणांची गुणपत्रिका, समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित जिल्हा परिषदेमार्फत त्यांना पाठवावयाची व्यवस्था करावी.

याव्यतिरिक्त सदर समिती ग्रामअभियानांतर्गत ग्रामपंचायतीना दयावयाच्या ३ विशेष पुरस्कारासाठी अभियानांतर्गत बक्षिस मिळालेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीतून, तीन ग्रामपंचायतीची निवड करेल.

ही निवड करताना प्रत्येक सदस्याने प्रथम प्रत्येक मुद्यावर स्वतंत्र गुण देवून त्यांचे एकत्रिकरण नंतर सदस्य सचिवाने करून त्याची सरासरी काढून नंतर त्याबाबतचा अहवाल निवड समितीतील सर्व सदस्यांच्या सह्या घेवून संबधित विभागीय आयुक्त व प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना बंद पाकीटात पाठवावयाचा आहे. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणांची गुणपत्रिका निवड समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित ग्रामपंचायतीस विहित नमुन्यात पाठवावयाची आहे.

अभियानांतर्गत पत्रकारास दयावयाच्या बक्षिसासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत तीन पत्रकारांची निवड करेल.

४. चौथी फेरी : विभागीय स्तरीय तपासणी

अ) समितीचे सदस्य : या समितीमध्ये पुढील सदस्य समाविष्ट असतील.

१. विभागीय आयुक्त - अध्यक्ष

२. उपायुक्त (विकास) - सदस्य सचिव

३. विभागीय आरोग्य उपसंचालक - सदस्य

४. विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - सदस्य

५. विभागीय उपसंचालक, भूसंवियं - सदस्य

६. विभागीय उपसंचालक, शिक्षण - सदस्य

७. विभागीय आयुक्तांनी निवडलेली कोणतीही एक सेवाभावी संस्था - सदस्य

८. एक ज्येष्ठ पत्रकार/संपादक - सदस्य

ब) कार्यपध्दती

ही समिती संबंधित विभागातील प्रत्येक जिल्हयातील गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय क्रमांक मिळविलेल्या ग्रामपंचायतीपैकी किमान ६० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या ग्रामपंचायतीना भेटी देईल व त्यापैकी गुणानुक्रमे दोन सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतींची निवड केरल. तसेच ग्रामअभियानांतर्गत ग्रामपंचायतीनां दयावयाच्या तीन विशेष पुरस्कारासाठी अभियानांतर्गत गुणानुक्रमे दोन बक्षिसे मिळालेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीमधून तीन ग्रामपंचायतीची निवड करेल.

ही निवड करताना प्रत्येक सदस्याने प्रथम प्रत्येक मुद्दयांवर स्वतंत्र गुण देवून त्यांचे एकत्रिकरण नंतर सदस्य सचिवाने करून त्याची सरासरी काढून नंतर त्याबाबतचा अहवाल निवड समितीतील सर्व सदस्यांच्या सह्या घेवून सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई यांना बंद पाकिटात पाठवावयाचा आहे. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणाची गुणपत्रिका निवड

समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित ग्रामपंचायतीस पाठवावयाची आहे.

तसेच विभागातून एका स्वच्छ जिल्हा परिषदेची व एका स्वच्छ पंचायत समितीची निवड ही समिती करेल.

ग्रामपंचायतीना दयावयाच्या सदर दोन्ही बक्षिसांची रक्कम पहिल्या वर्षी ५० टक्के बक्षीस समारंभप्रसंगी वितरित करण्यात येईल. त्या पुढील वर्षात सदर ग्रामपंचायतीनी स्वच्छतेचा दर्जा राखला आहे किंवा नाही याची तपासणी संबंधित विभागीय आयुक्तांनी करावी, त्यानंतर उर्वरित ५० टक्के बक्षिसाची रक्कम वितरित करण्याचा निर्णय त्यांनी घ्यावा.

५. पाचवी फेरी : राज्यस्तरीय तपासणी

अ) अभियानांतर्गत नेमलेल्या राज्यस्तरीय समितीचे सदस्य

१. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता - अध्यक्ष

२. सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - सदस्य

३. सचिव, ग्रामविकास विभाग - सदस्य

४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - सदस्य

५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा - सदस्य

६. महासंचालक, आरोगय महासंचालनालय अथवा त्यांनी नामनिर्देशन केलेले आरोग्य सहसंचालक - सदस्य

७. संचालक, प्राथमिक शिक्षण, पुणे अथवा त्यांनी नामनिर्देशन केलेले शिक्षण सहसंचालक

८. एक सेवाभागी संस्थेचा प्रतिनिधी म्हणून युनिसेफ/डब्ल्यू. एस. पी. चा प्रतिनिधी - सदस्य

९. एक ज्येष्ठ पत्रकार/संपादक - सदस्य

१०. उपसचिव तथा संचालक, सु. स. प्र. व्य. क. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - सदस्य सचिव

ब) कार्यपध्दती

ही समिती प्रत्येक विभागातील गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या ग्रामपंचायतीपैकी किमान ६० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या ग्रामपंचायतीना भेटी देईल व त्यापैकी गुणानुक्रमे तीन सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतीची निवड करेल. तसेच ग्रामअभियानांतर्गत ग्रामपंचायतीना दयावयाच्या तीन विशेष पुरस्कारासाठी, अभियानांतर्गत गुणानुक्रमे तीन बक्षिसे मिळालेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीमधून तीन ग्रामपंचायतीची निवड करेल.

ग्रामपंचायतीना दयावयाच्या सदर तीनही बक्षिसांची रक्कम पहिल्या वर्षी ५० टक्के बक्षीस समारंभप्रसंगी वितरित करण्यात येईल. त्या पुढील वर्षात सदर ग्रामपंचायतीनी स्वच्छतेचा दर्जा राखला आहे किंवा नाही याची तपासणी संबंधित विभागीय आयुक्तांकडून करून घेवून, त्यानंतर उर्वरित ५० टक्के बक्षिसाची रक्कम वितरित करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

९. मूल्यमापन पध्दत

अ) संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेअंतर्गत ग्रामपंचायतीची निवड

१. विहित निकषानुसार मूल्यमापन करण्यासाठी तपासणी सूची देण्यात आलेली आहे. (शासकीय परिपत्रकात 'परिशिष्ट -ब' मध्ये संबंधित तपशील दिला आहे. सदरचे परिशिष्ट सदर लघुशोधप्रबंधाच्या परिशिष्टे विभागात जसेच्या तसेच दिले आहे.) त्यानुसार प्रत्येक स्तरावरील समित्यांच्या सदस्यांनी तपासणी करून उपस्थित असलेल्या प्रत्येक सदस्याने स्वतंत्रपणे गुण दयावेत.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत केलेल्या कामगिरीच्या मूल्यमापनाचे निकष व त्याअनुषंगाने दयावयाचे गुण

अ. क्र.	विषय	कमाल गुण	मिळालेले गुण
मुद्दा क्र. १	पाणी व्यवस्थापन	३०	
मुद्दा क्र. २	सांडपाणी व्यवस्थापन	१५	
मुद्दा क्र. ३	शौचालय व्यवस्थापन	३०	
मुद्दा क्र. ४	घनकचरा व्यवस्थापन	२०	
मुद्दा क्र. ५	घर/गाव परिसर स्वच्छता	२०	
मुद्दा क्र. ६	वैयक्तिक स्वच्छता	१०	
मुद्दा क्र. ७	आरोग्य, शैक्षणिक व लोकशिक्षण	१०	
मुद्दा क्र. ८	अपारंपरिक ऊर्जा व्यवस्थापन	१५	
मुद्दा क्र. ९	कुटुंब कल्याण	२०	
मुद्दा क्र. १०	लोकसहभाग	२५	
मुद्दा क्र. ११	सामूहिक स्वयं पुढाकारातून नाविन्यपूर्ण उपक्रम	५	
	एकूण गुण	२००	

२. समिती सदस्यांनी दिलेल्या गुणांची बेरीज करून त्याला उपस्थित असलेले सदस्य संख्येने भागून जी सरासरी येईल तेवढे गुण त्या ग्रामपंचायतीला मिळतील.

३. मोठ्या लोकसंख्येच्या गावाना अभियान राबविण्यासाठी करावे लागणारे जादा प्रयत्न विचारात घेता त्यांना जादा गुण (weightage) देणे आवश्यक आहे. त्यासाठी उपरोक्त अनुक्रमांक २ मध्ये दिलेल्या प्रक्रियेनंतर ग्रामपंचायतीला जे सरासरी गुण मिळतील त्या सरासरी गुणावर लोकसंख्येनुसार टक्केवारीने दयावयाचे जादा गुण (weightage) काढून ते मूळ गुणात अंतर्भूत करून अंतिम मिळालेल्या गुणाची टक्केवारी खालीलप्रमाणे काढावी.

१००० लोकसंख्येपर्यंतच्या ग्रामपंचायती - प्रत्यक्ष मिळालेले गुण

१००० ते ३००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती - प्रत्यक्ष मिळालेले गुण + त्या गुणाच्या २ टक्के गुण

३००१ ते ६००० पर्यंतच्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायती - प्रत्यक्ष मिळालेले गुण + त्या गुणाच्या ३ टक्के गुण

६००१ पेक्षा जादा लोकसंख्येच्या ग्रामपंचायती - प्रत्यक्ष मिळालेले गुण + त्या गुणांच्या ५ टक्के गुण

यामुळे मोठ्या ग्रामपंचायतीना कराव्या लागणा-या जादा प्रयत्नांना योग्य तो न्याय मिळेल.

ब) विशेष पुरस्कारासाठी ग्रामपंचायतीची निवड

जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर दयावयाच्या विशेष पुरस्कारासाठी अभियानांतर्गत दयावयाच्या पारितोषिकासाठी निवडलेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीमघून विशेष पुरस्कार दयावयाच्या ग्रामपंचायतीची निवड करण्यात येईल. जिल्हा स्तरावरील या तीन विशेष बक्षिसांसाठी तीन ग्रामपंचायतीची निवड, नेमून दिलेल्या दुस-या जिल्हयाच्या जिल्हास्तरीय तपासणी समितीने करावी. तसेच विभाग स्तरावर, नेमून दिलेल्या दुस-या विभाग स्तरीय तपासणी समितीने करावी. राज्यस्तरावरील या तीन विशेष बक्षिसासाठी ग्रामपंचायतीची निवड राज्यस्तरीय तपासणी समितीतर्फे करण्यात येईल.

या तिन्ही स्तरावर या पारितोषिकासाठी निवड करताना, तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीपैकी 'कुटुंब कल्याण' या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीची निवड 'स्व. आबासाहेब खेडकर' पुरस्कारासाठी, 'पाणी व्यवस्थापन' या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीची निवड 'स्व. वसंतराव नाईक' पुरस्कारासाठी, तसेच 'सामाजिक एकता' या विषयावर सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीची निवड 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' पुरस्कारासाठी करण्यात येते.

या निवडीसाठी पुढील पध्दतीचा अवलंब केला जातो.

१. **जिल्हा स्तरावरील विशेष बक्षिसांसाठी**

अ) जिल्हयातील प्रत्येक पंचायत समितीतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील प्रथम दोन क्रमांकाच्या ग्रामपंचायतीची यादी केली जाते. (उदा. एका जिल्हयात १५ पंचायत समित्या असतील तर १५ x २ याप्रमाणे ३० ग्रामपंचायतीची यादी केली जाते.)

ब) त्यातून ६० टक्के पेक्षा कमी गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीना वगळण्यात येते. (उदा. ३० पैकी ४ ग्रामपंचायतीना ६० टक्के पेक्षा कमी गुण असतील तर त्यांना वगळून उर्वरित २६ ग्रामपंचायतींची यादी केली जाते.)

क) या ग्रामपंचायतीतून जिल्हा स्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील बक्षीस मिळालेल्या ३ ग्रामपंचायती वगळण्यात याव्यात. (उदा. २६ ग्रामपंचायतीमधून जिल्हा स्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील बक्षीस मिळालेल्या ३ ग्रामपंचायती असतील तर या ३ ग्रामपंचायती वगळण्यात येतात.)

जर ही बक्षिसे विभागून दिली असतील किंवा प्रथम तीन क्रमांकाच्या बक्षिसे मिळालेल्या एखाद्या ग्रामपंचायतीस आधीच्या वर्षात मिळाले असल्याने, चालू वर्षात बक्षिसाची रक्कम त्या ग्रामपंचायतीस न देता पुढील गुणानुक्रमांकाच्या ग्रामपंचायतीस बक्षिसाची रक्कम देण्यात आली असेल तर अशा बक्षीस रक्कम मिळालेल्या सर्व ग्रामपंचायतीना वगळण्यात येते.

उपरोक्त ग्रामपंचायती वगळून उर्वरित ग्रामपंचायतीपैकी कुटुंब कल्याण, सामाजिक एकता (लोकसहभाग) आणि पाणी व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीना अनुक्रमे स्व. आबासाहेब खेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्व. वसंतराव नाईक पुरस्कार देण्यात येतात.

२. विभाग स्तरावरील बक्षिसासाठी

प्रत्येक जिल्हयातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील प्रथम दोन क्रमांकाच्या ग्रामपंचायतीची यादी करून नंतर वरील पध्दतीचा अवलंब करून विभाग स्तरावरील विशेष बक्षिसासाठी ग्रामपंचायतीची निवड करावी.

३. राज्य स्तरावरील बक्षिसासाठी

प्रत्येक विभागातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत तपासलेल्या ग्रामपंचायतीपैकी, राज्य स्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत बक्षीस मिळालेल्या ग्रामपंचायती वगळून उर्वरित ग्रामपंचायतीपैकी ज्या ग्रामपंचायतीना ज्या विषयात सर्वात जास्त गुण मिळाले आहेत त्या ग्रामपंचायतीची विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.

क) राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धेअंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समित्याची निवड

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात, जास्तीत जास्त पंचायत समित्या व जिल्हा परिषदांनी भाग घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ग्रामपंचायतीना ग्रामीण भाग लोकसहभागातून स्वच्छ करण्यासाठी उद्युक्त करावे व त्यायोगे स्वच्छतेची परंपरा हळुहळू निर्माण करावी या दृष्टिकोनातून या अभियानांतर्गत सन २००१-०२ पासून जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धा घेण्यात येत आहे.

आता पंचायत समित्या व जिल्हा परिषदांच्या निवडीबाबत विहित केलेल्या गुणांकन पध्दतीनुसार प्रत्येक विभागातील सर्वोत्कृष्ट पंचायत समितीची व सवोत्कृष्ट पंचायत समित्या व तीन सवोत्कृष्ट जिल्हा परिषदेची निवड विहित केलेल्या गुणांकन पध्दतीनुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व सर्व पंचायत समित्यामधून राज्यस्तरीय समितीमार्फत करण्यात येईल. याबाबतचे निकष व निवड पध्दती स्वतंत्रपणे कळविण्यात येते.

बक्षीस वितरण

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामपंचायतीना पंचायत समिती स्तरावर, जिल्हा स्तरावर, विभागीय स्तरावर आणि राज्य स्तरावर बक्षिसे दिली जातात. त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१. पंचायत समिती स्तरीय पुरस्कार

पंचायत समिती स्तरावर तीन उत्कृष्ट ग्रामपंचायतीना संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम पुरस्कार जाहीर करण्यात येतात. ही निवड पंचायत समिती स्तरीय समिती करीत असते. पुरस्काराची रक्कम पुढीलप्रमाणे असते.

प्रथम पुरस्कार	:	२५,००० रूपये
द्वितीय पुरस्कार	:	१५,००० रूपये
तृतीय पुरस्कार	:	१०,००० रूपये

२. जिल्हा स्तरीय पुरस्कार

जिल्हा स्तरावर उत्कृष्ट ठरणा-या प्रत्येक जिल्हयातील तीन ग्रामपंचायतीना संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम पुरस्कार जाहीर करण्यात येतो. या ग्रामपंचायतींची निवड जिल्हा स्तरीय समितीमार्फत होते. पुरस्काराची रक्कम खालीलप्रमाणे असते.

प्रथम पुरस्कार	:	५ लाख रूपये
द्वितीय पुरस्कार	:	३ लाख रूपये
तृतीय पुरस्कार	:	२ लाख रूपये

३. विभागीय स्तरीय पुरस्कार

विभागीय स्तरावर उत्कृष्ट ठरणा-या प्रत्येक विभागातील दोन ग्रामपंचायतीना संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम पुरस्कार देण्यात येतो. ही निवड विभागीय स्तरीय समितीमार्फत केली जाते. पुरस्काराची रक्कम पुढीलप्रमाणे असते.

प्रथम पुरस्कार	:	१० लाख रूपये
द्वितीय पुरस्कार	:	६ लाख रूपये

४. राज्यस्तरीय पुरस्कार

संपूर्ण राज्यात उत्कृष्ट ठरणा-या पहिल्या तीन ग्रामपंचायतीना राज्यस्तरीय पुरस्कार दिले जातात. ही निवड राज्यस्तरीय समितीमार्फत केली जाते. राज्यस्तरीय पुरस्काराची रक्कम पुढीलप्रमाणे असते.

प्रथम पुरस्कार	:	२५ लाख रूपये
द्वितीय पुरस्कार	:	१५ लाख रूपये
तृतीय पुरस्कार	:	१२.५० लाख रूपये

तपासणी संदर्भात मार्गदर्शक सूचना

या अभियानाची अंमलबजावणी अधिकाधिक यशस्वीपणे व्हावी, त्यासाठी गावांची निवड नेमून दिलेल्या निकषानुसार नि:पक्षपातीपणे व्हावी यासाठी खालील सूचनांचे पालन तपासणी समितीने करणे आवश्यक आहे.

१. तपासणी अधिकाधिक नि:पक्षपातीपणे व्हावी व प्रत्येक सदस्याने आपल्या सद्सदविवेकबुध्दीस स्मरुन गुण प्रदान करावेत म्हणून चमूने तपासणीपूर्वी परिशिष्ट - फ मध्ये दिलेली प्रतिज्ञा घेऊन सह्या कराव्यात व तपासणीसाठी जावयाच्या गावात तपासणी सुरू करण्यापूर्वी गावातील पदाधिका-यांची सभा घेऊन त्या समोर सोबतच्या परिशिष्टात दिलेल्या प्रतिज्ञेचे वाचन करून त्याखाली समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांनी सह्या कराव्यात. सदर प्रतिज्ञापत्र आपल्या निकालासोबत निकालपत्राचा एक भाग म्हणून जतन करावे.

२. तपासणी चमूतील प्रत्येकाने स्वतंत्र गुण देऊन सदस्य सचिवांनी गुणांची एकत्रित बेरीज करून त्याला चमूतील सदस्यांच्या संख्येने भागून गुणांची सरासरी काढणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक स्तरावरील मूल्यमापन समितीचा निकाल समितीच्या सदस्य सचिवांच्या सहीने पाठविण्यात यावा.

३. प्रत्येक स्तरावरील निकाल जाहीर करताना तपासणी चमूने ज्या कार्यक्षेत्रातील गावाची तपासणी केली आहे त्या कार्यक्षेत्राच्या मुख्यालयात संबंधित अधिकारी, पदाधिकारी, पत्रकार व संबंधित ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी यांची सभा बोलावून त्यात जाहीर करावेत. यामुळे विशिष्ट गावाला प्रथम क्रमांक का देण्यात येत आहे, त्या गावाची वैशिष्ट्ये काय, इतर गावे कशात कमी पडली याबाबत तपासणी चमूला अशा सभांमध्ये स्पष्टीकरण देता येईल व काही शंका असल्यास त्याचे निरसनही करता येईल अशी अपेक्षा आहे. यामुळे तपासणी चमू आपली तपासणी आणखी जास्त जबाबदारीने पार पाडील व संबंधित गावातून नंतर ज्या तक्रारी उद्‌भवतात त्या कमी होऊ शकतील. अशा पारदर्शक पध्दतीने निकाल जाहीर झाल्याने बक्षिसास मुकलेल्या ग्रामपंचायतीची आपल्यावर अन्याय झाला ही भावना सुध्दा कमी होईल. सभेत जरी काही सूचना पुढे आल्या तर त्यांचा विचार समितीने जरूर करावयाचा आहे. परंतु समितीचा निकालच अंतिम राहणार आहे हेही स्पष्ट करण्यात यावे.

४. तपासणीमध्ये पारदर्शकता यावी म्हणून समितीमध्ये एक सेवाभावी संस्था व एका पत्रकाराचा समावेश करण्यात आला आहे. पत्रकाराची निवड जिल्हा पत्रकार संघाच्या संमतीने करावी व सेवाभावी संस्थेची निवड करताना संस्थेच्या नि:पक्षपातीपणाबाबत व अनुभवाबाबत योग्य तो विचार करून निवड करावी.

५. तपासणीसाठी एका गावासाठी ५ ते ६ तासाचा कालावधी आवश्यक आहे. तपासणी करताना घरे, दुकाने, शाळा, शासकीय इमारतीच्या आत जाऊन त्या तपासाव्यात, शौचालये, मुत्रीघरे, सांडपाणी व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था प्रत्यक्ष तपासावी आणि आरोग्य केंद्रातील, तलाठ्याकडील, ग्रामसेवकाकडील, अंगणवाडीतील सेविकेकडील दप्तराची तपासणी करून निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच तपासणी चमूने आपला निकाल शासनाकडे सादर करताना संबंधित गावाच्या

सरपंचाचे अथवा ग्राम स्वच्छता समितीच्या अध्यक्षांचे, चमूने गावाला भेटी देऊन चमूमेध्ये हजर असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत व चमूने गावात तपासणीसाठी खर्च केलेला वेळ व बघितलेल्या बाबी तसेच प्रतिज्ञापत्राचे वाचन केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. ही जबाबदारी समितीच्या सदस्य सचिवांची राहील.

१०) संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम बक्षिसाबाबतचे नियम

१. ज्या ग्रामपंचायत क्षेत्रातील एकूण किमान ५० टक्के कुटुंबांना शौचालयाची सुविधा आहे. अशाच ग्रामपंचायती या अभियानांतर्गत असलेल्या स्पर्धेसाठी पात्र ठरू शकतील. (सार्वजनिक शोचालयासंदर्भात प्रत्येकी पाच कुटुंबासाठी एक सीट)

२. ज्या ग्रामपंचायती संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात सहभागी होतील व ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे या अभियानांतर्गत ठरलेल्या प्रत्येक दिवसापासून कार्यक्रम गावात घेतील त्याच ग्रामपंचायती निवडीस पात्र ठरतील. बक्षिसासाठी अशा ग्रामपंचायतीचाच विचार करण्यात येईल.

३. प्रत्येक स्तरावरील समितीने दिलेला निर्णय हा अंतिम असेल. याबाबत कोणत्याही स्तरावर अपिल करता येणार नाही.

४. प्रत्येक स्तरावर बक्षिसासाठी ग्रामपंचायतीची निवड करताना क्रमांक १ चे बक्षिस शक्यतोवर विभागून देवू नये. समान गुण मिळालेच तर विशेष पारितोषिकासाठीच्या तीन मुद्दयात ज्या गावाला जास्त गुण असतील त्यांची क्रमांक १ साठी निवड करून समान गुण प्राप्त दुस-या ग्रामपंचायतीला द्वितीय क्रमांक दयावा व त्याच्या पुढच्या क्रमांकाच्या ग्रामपंचायतीला तृतीय क्रमांक दयावा. तसेच प्रत्येक स्तरावर उत्कृष्ठ ग्रामपंचायत निवडताना जर २ क्रमांकाच्या निवडीसाठी दोन ग्रामपंचायतीना समान गुण मिळाले तर क्रमांक २ व क्रमांक ३ च्या बक्षिसाची रक्कम एकत्रित करून ती दोन्ही गुणानुक्रमे २ वरील

ग्रामपंचायतीना समान विभागून दयावे. या परिस्थितीत क्रमांक ३ चे बक्षिस राहणार नाही.

५. अ) बक्षिसपात्र ग्रामपंचायतीपैकी विभाग स्तरापर्यंत पहिल्या आलेल्या ग्रामपंचायतीच पुन्हा पुढील वर्षी केवळ पुढल्या स्तरावरील स्पर्धेतील बक्षिसासाठीच पात्र असतील. मात्र आधीच्या वर्षी प्रथम आलेल्या ग्रामपंचायतीने पुढील वर्षात, आधीच्या वर्षी बक्षिस मिळालेल्या स्तरापासून पुढील स्तरावरील स्पर्धेत सहभागी न होता पहिल्या फेरीपासून म्हणजेच जिल्हा परिषद मतदार संघ स्तरीय तपासणी फेरीपासून स्पर्धेत सहभागी होणे आवश्यक आहे. तसेच तत्पूर्वी दिनांक २ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत नेमून दिलेल्या मोहिमा राबविणे आवश्यक आहे.

ब) राज्य स्तरावर अभियानांतर्गत गुणानुक्रमे आलेल्या ३ ग्रामपंचायती पुढील दहा वर्ष व पंचायत समित्या पुढील पाच वर्ष व जिल्हा परिषदा पुढील तीन वर्षे पुन्हा कोणत्याही स्तरावरील स्पर्धेत सहभागी होवू शकणार नाहीत. मात्र त्या अभियानात स्वत: सहभागी होवू शकतील व इतर ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना मार्गदर्शन करू शकतील.

क) पंचायत समिती, जिल्हा स्तरावर व विभागीय स्तरावर यापूर्वीच्या वर्षातील अभियानात मिळालेल्या क्रमांकाच्या वरचा क्रमांक चालू वर्षीच्या अभियानात त्याच स्तरावर मिळाल्यास अशा ग्रामपंचायतीना यापूर्वीच्या वर्षातील अभियानात मिळालेल्या बक्षिसाची रक्कम चालू वर्षी मिळालेल्या बक्षिस रक्कमेतून वजा करून उर्वरित रक्कम बक्षिसरूपाने देण्यात येईल.

ड) मात्र वरील क मध्ये नमूद ग्रामपंचायतीना त्याच स्तरावर यापूर्वीच्या वर्षातील अभियानात मिळालेला क्रमांक किंवा त्यापेक्षा

निम्न क्रमांक मिळाल्यास असे बक्षीस त्या ग्रामपंचायतीला न देता पोटनियम ६ (अ) च्या आधीन राहून मिळणा-या रक्कमेएवढे बक्षीस गुणानुक्रमांकावरील पुढील ग्रामपंचायतीला देण्यात यावे.

इ) मात्र वरील क मध्ये नमूद ग्रामपंचायतीना त्याच स्तरावर यापूर्वीच्या वर्षातील अभियानातील क्रमांकच पुन्हा चालू वर्षातील अभियानात मिळाल्यास सदर ग्रामपंचायतीस बक्षिसाची रक्कम मिळणार नाही. परंतु यापूर्वीच्या वर्षातील अभियानात त्यांना त्याच क्रमांकाचे बक्षीस विभागून मिळालेले असल्यास चालू वर्षी फरकाची रक्कम त्यांना देण्यात यावी. (मात्र ज्या ग्रामपंचायती सतत तीन वर्षे एखाद्या स्तरावरील तोच क्रमांक मिळवित असेल तर चौथ्या वर्षी ती ग्रामपंचायत त्या क्रमांकाच्या बक्षिसाची रक्कम मिळण्यास पात्र ठरेल.)

फ) मात्र या सर्व ग्रामपंचायतीना बक्षीस प्रमाणपत्र देण्यात येईल.

६. या अभियानास लाभलेला प्रतिसाद व लोकसहभाग कायम रहावा तसेच स्वच्छतेस/विकास कामास आलेली गती कायम रहावी यास्तव ग्रामपंचायतीनी केलेल्या कामाचे मूल्यांकन नि:पक्षपातीप्रमाणे होणे आवश्यक आहे. या संदर्भात प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीतील अधिकारी व पदाधिकारी यांची जबाबदारी महत्त्वाची आहे. त्यांच्या अनुपस्थितीमुळे अचूक मूल्यांकन व योग्य ग्रामपंचायतीची निवड होण्यास अडचणी निर्माण होतात. यास्तव तपासणी समितीतील किमान २/३ (दोन तृतीयांश) सदस्यांनी तपासणीसाठी हजर राहणे आवश्यक आहे. अगदीच अपरिहार्य परिस्थितीत जिल्हा परिषद मतदार संघ स्तरीय तपासणी समिती व पंचायत समिती स्तरीय तपासणी समितीतील ज्या पदाधिका-यांना व अधिका-यांना तपासणीसाठी हजर राहणे शक्य नसेल त्यांनी अनुक्रमे त्यांच्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची

व मुख्य कार्यकारी अधिका-यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा ते कारवाईस पात्र ठरतील.

७. तसेच ज्या जिल्हा परिषद अध्यक्षांना जिल्हास्तरीय तपासणीसाठी हजर राहणे शक्य नसेल त्यांनी मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांची तर ज्या मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्तांना तपासणीसाठी हजर राहणे शक्य नसेल त्यांनी मुख्य सचिवांची पूर्वपरवागनी घेणे आवश्यक आहे. अन्यथा मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्त हे सदर तपासणीस न गेल्यामुळे शासनाने त्यांना नेमून दिलेल्या कर्तव्यात त्यांनी कसूर केल्याचे गृहित धरून पुढील कारवाई करण्यात येईल. तसेच जे जिल्हा परिषद अध्यक्ष, मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांची पूर्वपरवानगी घेतल्याविना तपासणीसाठी गैरहजर राहतील त्यांना शासनाने नेमून दिलेल्या विकासकामाच्या कर्तव्यात त्यांनी कसूर केल्याचे गृहित धरून त्यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील नियम ५० अन्वये कारवाई करण्यात येईल.

११) बक्षिस रक्कमेचा विनियोग कसा करावा याबाबतचे नियम

१. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत पंचायत समिती स्तरापासून राज्य स्तरापर्यंत, ग्रामपंचायतीना मिळालेल्या बक्षीस रक्कमेचा तसेच जिल्हा स्तरापासून राज्य स्तरापर्यंत ग्रामपंचायतीना मिळालेल्या विशेष बक्षीस रक्कमेचा विनियोग

या स्वच्छता अभियानांतर्गत प्रत्येक स्तरावर वितरित केलेल्या बक्षीस रक्कमेचा विनियोग संबंधित ग्रामपंचायतीनी प्रामुख्याने आपल्या क्षेत्रातील विकासकामासाठी करणे आवश्यक आहे. यादृष्टीने बक्षीस रक्कमेच्या विनियोगाबाबतच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. बक्षिसाच्या रक्कमेतून विविध उपक्रमासाठी खर्च करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार ज्या ग्रामपंचायतीला बक्षिस मिळाले आहे त्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला असतील. याबाबत निर्णय घेण्यासाठी विशेष ग्रामसभा बोलावून त्या सभेत विनियोगाबाबत निर्णय घेण्यात यावा.

२. बक्षीस रक्कमेपैकी कमाल २ टक्के पर्यंत खर्च बक्षीस समारंभासाठी आयोजित करावयाच्या कार्यक्रमावर व अनुषंगिक बाबीवर खर्च करता येईल.

३. एकूण बक्षीस रक्कमेच्या ५ टक्के पर्यंत स्वच्छतेशी निगडीत बाबीच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात ग्रामसभेच्या निर्णयानुसार खर्च करता येईल.

४. बक्षिसाच्या एकूण रक्कमेच्या ५ टक्के पर्यंत खर्च ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय व कार्यालयीन बाबीसाठी ग्रामसभेच्या निर्णयानुसार करता येतील.

५. बक्षिस रक्कमेच्या कमाल १५ टक्के पर्यंत खर्च ग्रामपंचायतीतील रहिवाशांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी करता येईल. असा वैयक्तिक लाभ महिला, विद्यार्थी, युवक व ग्रामस्वच्छता योजनेत उत्कृष्ठ काम करणा-या ग्रामस्थांना देण्याचा निर्णय ग्रामसभा घेऊ शकेल. वैयक्तिक लाभाच्या योजनेत ग्रामस्वच्छतेशी निगडीत बाबी जसे की, पिण्याचे पाणी शुध्दता तपासणी उपकरणे पुरविणे, सफाई उपकरणे, परसबागेसाठी बी-बियाणे पुरविणे, स्वच्छता ठेवणेसाठी वस्तू अशा तत्सम स्वरूपाचे असावे. शक्यतो वैयक्तिक लाभ रोख रक्कमेत देण्याचे टाळावे. रोख रक्कम देण्याचा निर्णय ग्रामसभेने घेतल्यास तो एकूण १५ टक्के मर्यादेच्या आत प्रति कुटुंब रू. ३००/- पेक्षा जास्त असू नये.

६. उर्वरित रक्कम ग्रामपंचायतीतील स्वच्छतेशी निगडीत सार्वजनिक कामाकरीता खर्च करण्यात यावी. यात पाणी शुध्दता तपासणी उपकरणे, कीट खरेदी, ड्रेनेज (अंतर्गत व रस्त्याच्या बाजूची), कचराकुंड्या, पाणी स्त्रोत स्वच्छता, सार्वजनिक शौचालये बांधकाम/दुरूस्ती/देखभाल इ. तत्सम बाबीचा समावेश करता येईल.

ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीच्या कमिटीची राहिल. ग्रामसभेच्या निर्णयानुसार खर्च करून त्याचे हिशोब ठेवणे व ग्रामसभेला अहवाल सादर करणे आणि संबंधित यंत्रणांना याबाबत आवश्यक व इतर माहिती सादर करण्याची जबाबदारी सरपंच व ग्रामसेवक यांची राहील.

जिल्हा परिषदांनी या सूचना बक्षीस मिळविणा-या ग्रामपंचायतीच्या वेळोवेळी निदर्शनास आणाव्यात. तसेच या सूचनांनुसार ग्रामपंचायती खर्च करीत आहेत याची कालबध्द तपासणी संबंधित गटविकास अधिकारी, संबंधित जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच त्यांनी यासाठी नियुक्त केलेले अन्य अधिकारी यांनी करावी. ज्या प्रकरणात या सूचनांचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून येईल त्या प्रकरणात संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवकावर आवश्यक ती कारवाई तातडीने करावी व त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

संबंधित जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी याबाबत बक्षिसपात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेस हजर राहून आवश्यक ते मार्गदर्शन व सूचना कराव्यात.

२. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धेअंतर्गत जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना मिळालेल्या बक्षीस रक्कमेचा विनियोग

राज्यातील गुणानुक्रमे सर्वात स्वच्छ प्रथम तीन जिल्हा परिषदांना अनुक्रमे रू. १५, १० व ५ लाखाची रोख पारितोषिके शासनातर्फे देण्यात येतात. तसेच राज्यातील गुणानुक्रमे सर्वात स्वच्छ प्रथम तीन पंचायत समित्यांना अनुक्रमे रू. ७.५०, ५ व २.५ लाखाची रोख पारितोषिके शासनातर्फे देण्यात येतात. या पारितोषिकाच्या रक्कमेचा

विनियोग जिल्हा परिषदांनी/पंचायत समित्यांनी कोणकोणत्या बाबीसाठी करावा याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. पारितोषिकाची रक्कम प्रथम जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या स्वनिधीत जमा करावी व या रक्कमेतून खर्च करण्याबाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने घ्यावा. निर्णय घेण्यासाठी प्रसंगी विशेष सभा बोलाविता येईल.

२. या रक्कमेतून कोणत्याही परिस्थितीत वेतन व वेतनेत्तर बाबी तसेच दैनंदिन स्वरूपाचा सादिलवार खर्च करता येणार नाही.

३. जिल्हा परिषदेस/पंचायत समितीस सदर पारितोषिक मिळण्यासाठी ज्या पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी इ. चे परिश्रम कारणीभूत असतील त्यांना रोख पारितोषिके देऊन त्यांचा सन्मान करावा. ही निवड सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करावी. त्यासाठी पारितोषिकाच्या एकूण रक्कमेपैकी जास्तीत जास्त ५ टक्के रक्कम खर्च करता येईल. मात्र वैयक्तिक बक्षीसाची रक्कम जिल्हा परिषद स्तरावर रू. १०००/- पेक्षा व पंचायत समिती स्तरावर रू. ५००/- पेक्षा अधिक असू नये.

४. जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात ज्या शाळा, बालवाडया/अंगणवाड्या, पशुवैद्यकीय दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच अन्य शासकीय/निमशासकीय कार्यालये यांनी या अभियानात उल्लेखनीय कामगिरी बजावली असेल त्यांचा पारितोषिक देवून सन्मान करावा. ही निवड सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करावी. यासाठी सदर पारितोषिकाच्या रक्कमेतून जास्तीत जास्त १० टक्के पर्यंत खर्च करावा. मात्र सदर बक्षिसाची रक्कम जिल्हा परिषद स्तरावर रू. १०००/- पेक्षा व पंचायत समिती स्तरावर रू. ५००/- पेक्षा अधिक असू नये.

५. एकूण पारितोषिकाच्या रक्कमेच्या ५ टक्के पर्यंत स्वच्छतेशी निगडीत बाबीच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी तसेच अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार खर्च करता येईल.

६. एकूण पारितोषिकाच्या रक्कमेच्या १५ टक्के पर्यंत खर्च जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या कार्यालयीन सुधारणा, संगणकीकरण, इमारतीची डागडुजी यासाठी सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार करता येतील.

७. एकूण पारितोषिकाच्या रक्कमेच्या कमाल १० टक्के पर्यंत खर्च जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या कार्यालयातील व परिसरातील स्वच्छता व सजावटीसाठी सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार खर्च करता येतील.

८. जिल्हा परिषद/पंचायत समिती कार्यक्षेत्रातील शासकीय/निमशासकीय कार्यालये/संस्था पूर्ण कार्यक्षमतेने काम करण्यास चालना देण्यासाठी त्यांच्यात विविध स्पर्धांचे आयोजन करावे. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीसे देण्यासाठी पारितोषिकाच्या रक्कमेच्या ५ टक्के रक्कम खर्च करता येईल.

९. उर्वरित ५० टक्के रक्कम जिल्हा परिषदेच्या/पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात स्वच्छतेशी निगडीत सार्वजनिक कामाकरीता खर्च करण्यात यावी. मात्र यातून देखभाल दुरूस्ती वरील खर्च न करता स्थावर स्वरूपाची कामे करण्यात यावीत. यातून शासकीय/निमशासकीय संस्थांची कार्यालये, एस. टी. स्टँड, शाळा, गर्दीची सार्वजनिक ठिकाणे अशा ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून दयावी.

सर्वसाधारणपणे घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांची राहिल. सर्वसाधारणसभेच्या निर्णयानुसार खर्च करून त्याचे हिशोब ठेवणे व सर्वसाधारणसभेला अहवाल सादर करणे आणि संबंधित यंत्रणांना याबाबत आवश्यक

व इतर माहिती सादर करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) आणि पंचायत समितीतील गटविकास अधिकारी यांची राहिल.

१२) जिल्हा स्तरावर प्रथम आलेल्या ग्रामपंचायतीस यशवंत ग्राम तसेच स्वयंसेवी संस्थेचा दर्जा

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत पारितोषिक मिळविलेल्या ग्रामपंचायतीमध्ये निर्माण झालेली स्वच्छता विषयक स्थिती कायम टिकून राहिली तरच या स्पर्धेच्या मागील मूळ हेतू यशस्वी होईल. ग्रामीण जनतेस स्वच्छतेचे दृश्य व अदृश्य परिणामसुध्दा हळूहळू जाणवू लागतील. स्पर्धेत यशस्वी झालेले गाव पुन्हा अस्वच्छतेच्या गर्तेत जाणार नाही, तसेच गाव स्वच्छ करण्यासाठी गावाने घेतलेले परिश्रम, नाविन्यपूर्ण कल्पना, स्थानिक कौशल्य व वस्तूंच्या समर्पक वापराचे तंत्र इ. बाबी आजूबाजूच्या परिसरातील गावांनाही चालना देणा-या मार्गदर्शक ठराव्यात. तसेच बक्षिसपात्र गावातील स्वच्छतेची स्थिती टिकून रहावी म्हणून 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामस्वच्छता' स्पर्धेअंतर्गत प्रत्येक जिल्हयातून प्रथम क्रमांक मिळविलेल्या ग्रामपंचायतीना "यशवंत ग्राम" असे नामाभिधान देण्याचा निर्णय शासनातर्फे घेण्यात आला आहे. या ग्रामपंचायतींनी आपले गाव स्वच्छ करण्यासाठी घेतलेले परिश्रम आजूबाजूच्या परिसरातील इतर गावांनाही मार्गदर्शक ठरावेत. इतर गावांनीसुध्दा स्वच्छतेची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा म्हणून या ग्रामपंचायतीना सेवाभागी संस्थेचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या ग्रामपंचायतीनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली जिल्हयातील इतर गावातील पदाधिकारी व उत्साही कार्यकर्त्यांच्या भेटी व मार्गदर्शन शिबिरे आपल्या गावात आयोजित करावीत. तसेच परिसरातील इतर गावांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ पाठवून इतर गावात ज्या क्षेत्रात सुधारणा करण्यास वाव आहे त्याबाबत मार्गदर्शन करावे यासाठी आपल्या ग्रामपंचायतीअंतर्गत सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी व क्षमता वाढविण्यासाठी मनुष्यबळ विकास कार्यक्रम जिल्हा परिषद व इतर सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने राबवावेत. या ग्रामपंचायतीना जागतिक बँक अर्थसहाय्यीत पाणीपुरवठा व स्वच्छतेचा जलस्वराज्य व केंद्र शासनाच्या संपूर्ण स्वच्छता

अभियानांतर्गत सेवाभावी संस्थाकडून अभिप्रेत कार्यक्रम घेण्यासाठी नियुक्ती करता येईल.

या संदर्भात जिल्हा परिषद, पंचायत समिती व अन्य गावांशी संपर्क साधणे व भेटीचे/प्रशिक्षणाचे कालबध्द कार्यक्रम आखणे ही जबाबदारी ग्रामपंचायत समितीची राहिल व यानुसार अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित यशवंत ग्रामचे सरपंच, अभियान समितीचे अध्यक्ष व ग्रामसेवक यांची राहिल. ग्रामसभेमध्ये अशा केलेल्या कामाचा वेळोवेळी आढावा सादर करण्यात यावा.

संबंधित जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) तसेच संबंधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी याबाबत बक्षिसपात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या वेळोवेळी बैठका व कार्यशाळा घेऊन आवश्यक ते मार्गदर्शन व सूचना कराव्यात.

विभागीय आयुक्तांचे अध्यक्षतेखालील समिती/समितीतील सदस्य, त्यांचे विभागातील यशवंत ग्रामाचे वेळोवेळी तपासणी करून मूल्यमापन करतील व गावांचा यशवंत ग्राम दर्जा कायम ठेवणेबाबत निर्णय घेतील. स्वच्छता स्तर घसरला असे वाटल्यास त्यांचा यशवंत ग्राम दर्जा काढून घेण्याची शिफारस शासनास करतील. शासन त्यावर संबंधित गावाचे मत ऐकून घेवून निर्णय देईल व तो अंतिम असेल. त्यासंदर्भात कोठेही अपिल करता येणार नाही. तसेच संबंधित पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे अधिकारी वेळोवेळी सदर गावांना भेटी देवून स्वच्छतेच्या दर्जाबाबतची तपासणी करतील व त्याबाबतचा आपला अहवाल विभागीय आयुक्तांना सादर करतील.

संदर्भ

परिपत्रक पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. अभियान-२००३/प्र.क्र.२७८/पापु १६/मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक २४ सप्टेंबर २००३